# सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

**E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७**

**Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७११३**


क्रमांक :-विकाअ/शिक्षण/अपंग/२०१२/2386

दिनांक :- 31/08/2012

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय / अनुदानित / विनाअनुदानित
अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / एम.बी.ए/एम.सी.ए/वास्तूशास्त्र
पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी संस्था.

विषय :- **मुख्य आयुक्त (नि:शक्तता), सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचा मुंबई दौरा - (दि. २६.८.२०१२ ते २८.८.२०१२).**

**संदर्भ :-** १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी/अपंग दौरा/२०१२/१११/१२८५ दिनांक २३/०८/२०१२.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/अपंग/२०१२/२२७३ दि. २२/०८/२०१२.

प्रस्तूत प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या मार्फत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांना मान्यता दिली जाते, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने वरील संस्थांना मान्यता देताना काही निकष व मानके ठरविलेली आहेत. हया संदर्भात परिषदेकडून मार्गदर्शक सूचना म्हणून प्रत्येक शैक्षणिक वर्षात अप्रुवल प्रोसेस हॅण्डबुक प्रसिध्द करण्यात येते. ज्यामध्ये संस्थांना मान्यता देताना संस्थेत आवश्यक असणा-या सर्व सोयी सुविधा इ त्यादीचा उल्लेख करण्यात आलेला आहे. शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून परिषदेने प्रसिध्द केलेल्या अप्रुवल प्रोसेस हॅण्डबुक नुसार अपंगाकरीता सोयी सुविधा संस्थेत असने आवश्यक आहे. याची खात्री करुन संस्थेस मान्यता देण्यात येते.

आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये आपल्या संस्थेत अपंगाकरीता सोयी सुविधा उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत विचारणा करण्यात आलेली आहे तेव्हा असे निदर्शनास आले की, काही संस्थेत अपंगाकरीता ज्या सोयी सवलत असने आवश्यक आहे त्या नसल्याचे दिसुन आले व काही संस्थेत सदर सोयी सुविधांबाबत कार्यवाही प्रगतीपथावर असल्याचे दिसुन आले.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, अपंगासाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध नाहीत अशा सर्व संबंधीत संस्थांनी अपंगासाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत सुचित करण्यात येत आहे.

S.R. Pasebard

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** प्रक्रिया योजक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळी टाकण्याकरीता.

E:\All Letters Manish.doc